| MHBI100012202006 | <u>**नियमीत दिवाणी दावा क्रमांक १८४/२००६ मधील निशाणी क्र.१३९ वरील आदेश**</u> |
| --- | --- |

[०१] प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र.९ याच्याविरुध्द पारित करण्यात आलेला विना कैफियतचा आदेश रद्द करुन त्यांची कैफियत अभिलेखावर घेण्याच्या विनंतीसह सादर केलेला आहे.

[०२] वादीच्या विद्वान वकिलांनी अर्जाच्या पाठीमागील पानावर म्हणणे सादर करत, सदरील प्रकरणातील प्रतिवादी दिलेले कारण संयुक्तीक नाही. त्यामुळे अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

[०३] अर्जाचे, त्यावरील म्हणण्याचे आणि अभिलेखाचे अवलोकन केले.

[०४] दोन्ही बाजुच्या विद्वान वकिलांचा युक्तिवाद ऐकला.

[०५] प्रस्तुतचा दावा हा वाटणी करुन वेगळा ताबा मिळणेबाबत दाखल केलेला आहे. म्हणजेच प्रस्तुतच्या दाव्यात दोन्ही पक्षकारांचे स्थावर मिळकतीसंदर्भात हक्क व अधिकार गुंतलेले आहेत. यात काही एक शंका नाही की, प्रतिवादी क्र. ९ यांना कैफियत सादर करण्यास उशीर झालेला असुन वेळेत कैफियत सादर न केल्यामुळे त्यांच्याविरुध्द प्रस्तुत दावा विना कैफियत चालविण्यात आलेला आहे. मात्र आज रोजी पावेतो प्रस्तुतच्या दाव्याची सुनावणी सुरु झालेली नाही. अशा परिस्थितीत प्रतिवादी क्र. ९ यांच्याविरुध्द झालेला विना कैफियत आदेश त्यांच्यावर योग्य तो खर्च लादुन रद्द करुन त्यांची कैफियत अभिलेखावर घेणे न्यायोचित होईल. एकुणच वरील कारणांचा विचार करता, खालील आदेश पारीत करण्यात येत आहे.

<u>**आदेश**</u>

(१) अर्ज रक्कम रुपये २००/– च्या खर्चावर मंजुर करण्यात येत आहे.

(२) प्रतिवादी क्र. ९ याच्याविरुध्द पारित करण्यात आलेला विनाकैफियतीचा आदेश रद्द करण्यात येत असुन त्याची कैफियत अभिलेखावर घेण्यात येत आहे.

(३) प्रतिवादी क्र. ९ यांनी  पुढील तारखेपावेतो खर्चाची रक्कम रुपये २००/– न्यायालयात जमा केल्यास ती वादीस देण्यात यावी.

(४) प्रस्तुतच्या अर्जाचा खर्च प्रतिवादी क्र. ९  यांनी सोसावा.

Digitally signed by PRAVIN VISHWAS PATIL
Date: 2023.09.05 12:13:50 +0530

(पी.व्ही. पाटील)
दिनांकः– ०४.०९.२०२३.
२ रे सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर,
केज.

CERTIFICATE

I affirm that the contents of this PDF file are word to word as per original judgment/ order.

| | |
|---|---|
| Dictated on | : 04.09.2023 |
| Transcribed on | : 04.09.2023 |
| Checked & signed on | : 04.09.2023 |

Sd/-

(S.Y. Gore),

Stenographer Grade-3,